# VJTI MUMBAI
वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था
Veermata Jijabai Technological Institute
(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019
Phone:+91 22 24198101/102 • Fax:+91 22 24102874 • www.vjti.ac.in


क्र.लेखा/शिवृ/अ.जा/भा.डॉ.बा.आं.स्वा.योजना/२०२४-२५/६७६५/२०२५ दिनांक : ०५/०३/२०२५
5 MAR 2025

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना
## (SC) व नवबौध्द (Navbuddha) प्रवर्गातील विद्यार्थी

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता संस्थेतील नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना सदर परीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मुंबई शहर / उपनगर जिल्हयामध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागार्फत वसतिगृहे कार्यरत आहेत. सदर वसतिगृहामध्ये बाहेर गावावरून मुंबई मध्ये शिक्षण घेण्याकरिता आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना / विद्यार्थीनींना निवास, भोजन, दरमहा निर्वाह भत्ता, स्टेशनरी तसेच इतर शैक्षणिक सोयी सुविधा नि:शुल्क पुरविण्यात येतात. तरी संस्थेतील (SC) व नवबौध्द (Navbuddha) विद्यार्थी / विद्यार्थीनींनी या वसतिगृहाचा लाभ घ्यावा असे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांसकडून आवाहन करण्यात आले होते.

सदर योजनेचा लाभ घेण्याकरिता विद्यार्थी / विद्यार्थीनींनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा आहेत. वसतीगृहाचा अर्ज विहीत वेळेत सादर केलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृह प्रवेश मिळाला नसेल अशा विद्यार्थ्यांचे अर्ज आपोआप भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीता वर्ग होणार आहेत. अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा स्वाधार योजनेला अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

सदर योजने अंतर्गत प्रति वर्षी ६०,०००/- इतकी रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बॅक खात्यात थेट शासनामार्फत जमा केली जाईल. **तरी अनुसूचित जाती (SC) व नवबौध्द (Navbuddha) प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्याकरिता दिनांक १५/०३/२०२५ पूर्वी ऑनलाईल अर्ज करावयाचा आहे. तसे न केल्यास आपण स्वाधार योजनेपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी विद्यार्थी / पालकांची राहील. याची गांर्भियाने नोंद घ्यावी.**

**अर्ज करण्याचे संकेतस्थळ : https://hmas.mahait.org**

अध्यक्ष
शिष्यवृती समिती

प्रत : सर्व विभाग, मुला-मुलींचे वसतीगृह, संस्थेचे संकेतस्थळ